**MHKO100002112020**

<u>**आदेश निशाणी क्र. २१**</u>

१. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज त्यांचे विरुध्द झालेला "विना कैफीयत" आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांचा अर्ज व वादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचे विधीज्ञ यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजुचे विधीज्ञ यांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

३. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, वादी यांनी दावा दाखल केल्यानंतर वादी व प्रतिवादी यांच्यादरम्यान वेळोवेळी आपसात तडजोडीसंबंधी चर्चा होवून तडजोड होण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्यामुळे प्रतिवादी यांनी आपली कैफीयत दाखल केलेली नव्हती. प्रतिवादी यांनी कैफीयत व म्हणणे देणेस जाणुनबुजून विलंब केलेला नाही. प्रतिवादी यांची कैफीयत व म्हणणे देणेस परवानगी दिलेस दावा गुणदोषावर चालून न्यायनिर्णय होणेस मदत होणार आहे. सबब सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, सदर कामातील प्रतिवादी क्र. १ यांना दिनांक ०४/०२/२०२० रोजी दावेचे समन्स व नोटीस लागू झालेली आहे. जवळ जवळ ३ वर्षे ७ महिने कैफीयत व म्हणणे देणेस प्रतिवादी यांनी विलंब केलेला आहे. सबब प्रतिवादी यांचेवर रक्कम रुपये ५०००/- खर्च बसवून अर्ज मंजूर करावा असे कळविले आहे.

**५.** वादी यांनी सदरचा दावा कायम मनाईसाठी दाखल केला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी यांचे विरुध्द दिनांक १५/०३/२०२१ रोजी विना कैफीयत आदेश पारीत करणेत आलेला आहे. त्यांनंतर प्रस्तुत प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक २१/०२/२०२३ रोजी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रस्तुत प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेखावर येणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. प्रतिवादी यांचे अर्जातील कथनावर अविश्वास दाखविण्यासारखी परिस्थिती अभिलेखावर आलेली नाही. परंतु प्रतिवादी यांनी आपली कैफीयत दाखल करणेस बराच उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी केलेल्या उशीराबाबत त्यांचेवर खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

**१)** प्रतिवादी क्र. १ यांचा अर्ज वादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे मात्र) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**२)** प्रतिवादी क्र. १ यांनी खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी यांची प्रस्तुत अर्जासोबत दिलेली कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेणेत यावी.

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ३०/१०/२०२३

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज